NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २२.१०.२०२६ गुरूवार

१) मा. न्यायालयातुन आरोपीला खुनाचे गुन्ह्यात आजन्म कारावासाची शिक्षा :–

दिनांक २२.१०.२०२६ रोजी मा. जिल्हा न्यायाधिश–२ तथा अति. सत्र न्यायाधिश, नागपुर श्री. एस.एच. ग्वालानी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. २७६/२०२० मधील, पोलीस ठाणे नंदनवन येथील अप. क्र. ४६८/२०२० कलम ३०२, ५०४, १८८, २७० भा.दं.वि. या गुन्ह्यातील **आरोपी नामे एकनाथ उर्फ बंटी प्रेमराज टापरे, वय ३५ वर्षे, रा. केडीके कॉलेज रोड, नंदनवन झोपडपट्टी, गल्ली नं. ५, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/– रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम ५०४ भा. दं.वि. अन्वये ०६ महीने सश्रम कारावासाची शिक्षा व १,०००/–रू. दंड आणि दंड न भरल्यास १५ दिवस अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत राहणारा आरोपी व फिर्यादी हे एकमेकांचे शेजारी असुन, त्यांचेत मागील काही दिवसांपासुन गाडी पार्क करण्याचे कारणावरून भांडण होते. दिनांक २४.०६.२०२० चे २१.३० वा. चे सुमारास, फिर्यादीची पत्नी नामे सौ. आरती नितीन गिरडकर, वय ३४ वर्षे ह्या त्यांचे घराचे बाजुला गाडी पार्क करीत असतांना, यातील आरापीने त्यांना गाडी पार्क करून नको असे म्हणुन फिर्यादीचे पत्नीसोबत शिवीगाळ व भांडण करून घरातुन चाकु आणुन फिर्यादीचे पत्नीचे शरीरावर वार करून, तीला जिवानिशी ठार केले. फिर्यादी नितीन नारायणराव गिरडकर, वय ४२ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे गुन्हा दाखल केला होता. आरोपीस दिनांक २५.०६.२०२० रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन वपोनि. सांदीपान पवार यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती सई खेडकर मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. आर. डी. गायकवाड यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात वपोनि. कैलास देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. अलका ठेंगरे, पोअं. अमोल कोठीया यांनी काम पाहिले.

यातील आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर पोलीस ठाणे नंदनवन व सक्करदरा हद्दीत दुखापत करणे, मारहाण करणे, धमकी देणे, शस्त्र बाळगणे, जबरी चोरी, खंडणी मागणे ईत्यादी गंभीर स्वरूपाचे एकुण ३४ गुन्हे दाखल आहेत. आरोपीविरूध्द वेळोवेळी प्रतीबंधक कार्यवाही करून, एम.पि.डी.ए. अंतर्गत जेल दाखल सुध्दा करण्यात आलेले होते.

२) मा. न्यायालयातुन आरोपीला कारावासाची शिक्षा :–

दिनांक २२.१०.२०२६ रोजी मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ०७, नागपुर, श्री. रवि श्रीधर काळे यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ६८०/२०१८ मधील, पोलीस ठाणे जरीपटका येथील अप. क्र. ८७६/२०१७ कलम ३२४, ५०४, ३४ भा.दं.वि. या गुन्ह्यातील **आरोपी क्र. १) मयुर मानिक वंजारी, वय २८ वर्षे, २) सौरभ मानिक वंजारी, वय ३० वर्षे, ३) सौ. मालती उर्फ पार्वती मानिक वंजारी, वय ५२ वर्षे, सर्व रा. दिलीप नगर,**

बेझनबाग, प्लॉट नं. ३९४/ए/४, जरीपटका, नागपूर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपींना कलम ३२६, ३४ भा.दं.वि. अन्वये प्रत्येकी ०२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास प्रत्येकी ०२ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.

यातील आरोपी व फिर्यादी हे नातेवाईक असुन एकाच घरी फिर्यादी वरचे माळ्यावर व आरोपी तळमजल्यावर राहतात. दिनांक १५.०९.२०१७ चे १२.०० वा. चे सुमारास, फिर्यादीलात्यांचे संडासचा पाईप कोणीतरी तोडत असल्याचा आवाज आल्याने त्यांनी बाहेर गल्लीत जावुन पाहले असता, यातील आरोपी हे लोखंडी हातोडीने पाईप तोडतांना दिसुन आले. फिर्यादीने हटकले असता, आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करून, झगडा भांडण केले. व फिर्यादीचे डोक्यावर लोखंडी हातोडीने मारून फिर्यादीस जखमी केले होते. फिर्यादी सौ. संगीता चुडामन वंजारी, वय ५२ वर्षे, रा. गुरूनानक स्कुल जवळ, मुकुंद नगर, जरीपटका, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपींविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका येथे गुन्हा दाखल केला होता. आरोपींना दिनांक १६.०९. २०२० रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन पोहवा. दिलीप वानखेडे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. सुंदरलाल सावळकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. एच. डी. कामडे यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. प्रतीमा कानेकर, पोहवा. योगेश बोंद्रे यांनी काम पाहिले.

<u>३) परिमंडळ क्र. ४ अंतर्गत पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे दाखल गैरकायद्याची मंडळी जमवुन जिवे ठार मारणाऱ्या अट्टल गुन्हेगारांविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.</u>

फिर्यादी श्रीमती गायत्री निकेश सुर्यवंशी, वय ३५ वर्षे, रा. बिल्डींग नं. ४२, क्वॉर्टर नं. १, आवास योजना, सिम्बायोसिस कॉलेज जवळ, वाठोडा, नागपुर यांचा मुलगा नामे पवन निकेश सुर्यवंशी, वय १८ वर्षे याचे मित्राचा काही दिवसांपुर्वी गाडीचा कट लागल्याने आरोपींसोबतवाद–विवाद झाला होता. दिनांक २५.०७. २०२६ चे १५.३० वा. ते १६.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे मुलास व त्याचे मित्राना आरोपी यांनी फोन करून मानेवाडा स्मशान घाट येथे बोलण्याकरीता फोनकरून बोलाविलेवरून फिर्यादीचा मुलगा व अमन काळे तसेच ईतर मित्र गेले असता, तेथे आरोपी १) यश दिलीप लोदे, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. ११४, वेणु कॉर्नर, न्यु ज्ञानेश्वर नगर, नागपुर, २) वेदांत संदीप कापटे, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. ४२, महाकाली नगर नं. ३, हुडकेश्वर, नागपुर ३) कुणाल धनराज चौरसिया, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. ११५, जुना ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा, अजनी, नागपुर ४) देवांश प्रविण श्रीरामे, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ६४, सुशिला हाऊसिंग सोसायटी, मनिष नगर, नागपुर, ५) रौनक रमेश राव, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ३१, जय गुरूदेव नगर, मानेवाडा, बेसा रोड, नागपुर, ६) प्रज्वल गिरीष नायडु, वय २० वर्षे, रा. कबीरा कॉन्व्हेंट मागे, बेलतरोडी, नागपुर, ७) अनुराग पराग शास्त्रकार, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. २२५, जानकी नगर, उदय नगर, रिंगरोड, नागपुर ८) राजकुमार उर्फ लाला पहवारीप्रसाद उर्फ कमकर, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. ३५०, सिध्देश्वरी नगर, हुडकेश्वर ९) करण किसन सोलंकी, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. २५, मॉ भगवती नगर, हुडकेश्वर १०) पियुष नारायण बघेल, वय १८ वर्षे, रा. प्लॉट नं. १४, बोहरेचे घरी किरायाने, ज्ञानेश्वर नगर, गल्ली नं. ३, अजनी व पाहीजे आरोपी ११) यश राजु गोमासे, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. ११, गल्ली नं. १, बजरंग नगर, १२) अमन धनराज चौरसिया, वय १८ वर्षे, रा. प्लॉट नं. ११५, जुना ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा, अजनी, नागपुर व ईतर ०३ विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी संगणमताने कट रचुन, फिर्यादीचा मुलगा तसेच, त्याचा मित्र अमन अजय काळे, वय १७ वर्षे, रा. विठ्ठल नगर यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने शस्त्राने वार करून, गंभीर जखमी केले. फिर्यादीचे मुलास उपचाराकरीता केशव हॉस्पीटल मानेवाडा चौक येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन त्यास मृत घोषीत केले होते. फिर्यादी यांनी

दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम १०३(२), १०९(१), ६२(२)(अ), १९१(३), १९० भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यातील आरोपी क्र. १ ते १० यांना अटक करण्यात आली असुन ते सद्या कारागृहात आहेत. आरोपी क्र. ११ व १२ हे फरार असून अद्याप मिळुन आले नाही त्यांचा शोध सुरू आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपींचा टोळीप्रमुख यश दिलीप सोदे हा शरीराविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात आरोपी असून त्याचे विरूध्द खुन, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दरोडयाची तयारी, दुखापत, बेकायदेशीर हत्यार बाळगणे, मारामारी शिवीगाळ जिवे ठार मारण्याची धमकी यासारखे गंभीर स्वरूपाचे ०७ गुन्हे दाखल आहेत. तसेच, सदर टोळीविरूध्द एकुण ११ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. सदर टोळी मधील आरोपीतां विरूध्द वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करून सुध्दा त्यांनी त्यांची गुन्हेगारी कृत्य सुरूच ठेवले होते. करिता सदर टोळी विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अन्वये कारवाई करणेबाबत वरीष्ठांचे आदेश प्राप्त झाल्याने आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ४, नागपुर शहर यांचे मार्फतीने सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा– १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४) यांनी केली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मा. श्री. नरेंद्र हिवरे सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) हे करीत आहेत.

गुन्हेगारी प्रवृत्ती करणारे तसेच, संघटीत गुन्हेगारी करणारे गुन्हेगारांविरूध्द नागपुर शहर पोलीसांची शुन्य सहनशिलता (झिरो टॉलेरन्स) भुमिका कायम राहणार आहे.

४) मा. अप्पर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) कार्यालय येथे गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे रेकॉर्डवरील एकूण ४० आरोपींचे आदान–प्रदान हे दिनांक २२.१०.२०२६ रोजी, मा. अपर पोलीस आयुक्त कार्यालय (दक्षिण प्रभाग), नागपुर शहर येथे मा. श्री. वसंत परेदशी (दक्षिण प्रभाग) यांचे उपस्थतीत पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी एकूण ११ पोलीस ठाणे येथील आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील असे एकुण ४ अधिकारी व २९ अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण ८८९ अटक आरोपीतांना आदान–प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.

५) मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. ४ यांचे विशेष पथकाची कामगिरी :– कोंबड्यांचे झुंजीवर जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उपायुक्त परि.क्र. ४ नागपुर शहर यांना मिळालेल्या गोपनिय माहीतवरून, त्यांचे विशेष पथकाने दिनांक २१.१०.२०२६ चे १६.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत प्रविण बक्सरे चे घरामागे रेल्वे पटरीजवळ जाटतरोडी, ईमामवाडा येथे जिवंत कोंबड्यांचे पायाला धारदार काती लावुन कोंबड्यांची झुंज करून, त्यावर पैशाची बाजी लावुन हात–जितचा जुगार खेळणारे आरोपी क्र. १) संकेत राजु नाईक, वय २६ वर्षे, रा. कर्नलबाग, गणेशपेठ, नागपुर २) आदीत्य कैलास समुद्रे, वय २४ वर्षे, रा. सिरसपेठ, नागपुर ३) तन्मय मनोहर बारापात्रे, वय २० वर्षे, रा. प्रेमनगर, नारायणपेठ, शांतीनगर ४) धम्मदीप सुनिल खंडारे, वय २० वर्षे, रा. जाटतरोडी नं. २, ईमामवाडा ५) विक्की भोजराज बारापात्रे, वय ३५ वर्षे, रा. बाळाभाऊपेठ, पाचपावली, ६) प्रतीक निळकंठ पौनिकर, वय २५ वर्षे, रा. जुनी मंगळवारी, गुजरी चौक, ७) विलास सिताराम पौनिकर, वय ४९ वर्षे, रा. जुनी मंगळवारी, लकडगंज ८) सोमलाल पुणाजी नागरीकर, वय ५५ वर्षे, रा. हिवरी ले–आऊट, भिमचौक, ९) मनोहर कंठीराम समर्थ, वय ५५ वर्षे, रा. न्यु शुक्रवारी, तेलीपुरा, १०) सागर लिलाधर धनजुडे, वय २८ वर्षे, रा. किल्ला रोड, महाल हे त्यांचा साथीदार पाहीजे आरोपी नामे ११) प्रविण बक्सरे याचे मदतीने जुगार खेळतांना मिळुन आले. जुगार खेळणारे एकुण १० ईसमांना ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातुन ०६ जिवंत कोंबडे, रोख १३,५२०/–रू., ०७ मोबाईल फोन, लोखंडी काती, ०८ मोटारसायकली असा एकुण ५,९६,८२०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे ईमामवाडा येथे कलम १२(क) महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवास्तव ईमामवाडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४) यांचे मार्गदर्शनाखाली, विशेष पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे कळमना :–शस्त्र बाळगुन धुमधुम करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २२.१०.२०२६ चे ०१.०० वा. चे सुमारास, कळमना पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळाली की, विजयनगर देशी भट्टी जवळ एक ईसम शस्त्रासह फिरत आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम दिसल्याने, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अज्जु शिव गिल्लोर, वय १९ वर्षे, रा. सावरकर ले–आऊट, वाघमारे किराणा स्टोअर्स जवळ, विजयनगर, कळमना, नागपुर असे सांगीतले.

आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. प्रमोद कंगाले यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे सपोनि. भवाली यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १७.१०.२०२६ चे १४.०० वा. ते दिनांक २२.१०.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत क्वार्टर नं. बि/६, ब्लॉक नं. बि/१, सिएमपीडीआय कॉलोनी, नागपूर येथे राहणारे देवी प्रतापसिंग चव्हाण, वय ४५ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाकडे जयपुर (राज्यस्थान) येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीचे लॉकरमधील रोख ५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ७,५०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी सिध्दार्थ नारायणलाल वर्मा, वय ३५ वर्षे, रा. क्वार्टर नं. सि/४१, ब्लॉक नं. सि/४, सिएमपीडीआय कॉलोनी, जरीपटका, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. चंद्रशेखर गभने ९७६५३९४१८५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. ८ वे प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	५८५३/ २०१४	कलम ३५४(५) भा.दं.वि.	अमोल मनोहर गोतमारे, रा. प्लॉट नं. २७,गोधणी रोड, झिंगाबाई टाकळी, नागपूर	२९.१०.२०२६
२.	मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधीश, क स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०३०२९/ २०१५	कलम ३,४,७ अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम	संजय उर्फ चेतन राधाकिशन अग्रवाल, रा. प्लॉट नं. ४७, वर्धमान नगर, नागपूर	२६.१०.२०२६
३.	मा. १२ वे सहदिवाणी न्यायाधीश, क स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०११६९/ २००८	कलम २९४, ५०६(ब),३४ भा.दं.वि.	हसमतुल्ला उर्फ हरबेभाई मियादिन शेख, रा. चार खंबा चौक, टेका, पाचपावली, नागपूर	३०.१०.२०२६
४.	मा. १२ वे सहदिवाणी न्यायाधीश, क स्तर व प्रथम	३२४१/ २०१८	कलम ८२ सीआरपीसी	राजा उर्फ फिरोज इस्त्राईल अंसारी, वय २३ वर्षे, रा.	२८.१०.२०२६

	श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.			सैलाब नगर, जुनी कामठी, ह. मु. प्लॉट नं. ६१, पारडी, मेश्रामचे घरी किरायाने, नागपूर	
५.	मा. १२ वे सहदिवाणी न्यायाधीश, क स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	२७६/ २०१६	कलम ८२ सीआरपीसी	सांझ उर्फ दिप्ती राजेंद्र मोहंती, वय २१ वर्षे, रा. सुनील मेश्रामचे घरी किरायाने, सुगत नगर, जरीपटका, नागपूर	२८.१०.२०२६
६.	मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश–१२ साहेब, नागपुर.	५१७/ २०२३	कलम ३७६, ३७६(२)(एन), ३२३, ५०४ भा.दं.वि.	ऋषभ मंसाराम सहारे, वय २८ वर्षे, रा. ब्लॉक नं. २९, क्वार्टर नं. ४५९, म्हाडा कॉलोनी, कपीलनगर, नागपुर.	२६.१०.२०२६

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.